### भारतात आजपर्यंत गठीत झालेले वित्तआयोग
### (Finance Commissions of India)

| वित्तआयोग | स्थापनावर्ष | अध्यक्ष | अंमलबजावणी वर्ष |
|---|---|---|---|
| पहिला | १९५१ | के.सी. नियोगी | १९५२-५७ |
| दूसरा | १९५६ | के. संथानम | १९५७-६२ |
| तिसरा | १९६० | ए. के. चंदा | १९६२-६६ |
| चौथा | १९६४ | पी. व्ही. राजमन्नार | १९६६-६९ |
| पाचवा | १९६८ | महावीर त्यागी | १९६९-७४ |
| सहावा | १९७२ | ब्रम्हानंद रेड्डी | १९७४-७९ |
| सातवा | १९७७ | जे. एम. शेलट | १९७९-८४ |
| आठवा | १९८३ | वाय. बी. चव्हाण | १९८४-८९ |
| नववा | १९८७ | एन.के. पी. साळवे | १९८९-९५ |
| दहावा | १९९२ | के.सी. पंत | १९९५-२००० |
| अकरावा | १९९८ | ए.एम. खुसरो | २०००-२००५ |
| बारावा | २००३ | सी. रंगराजन | २००५-२०१० |





# संसदीय नियंत्रण
## (Parliamentary Control)

Kautilya in his **Arthashastra** stresses that... The king need to be active **and discharge** his duties well as the root of wealth is activity **and through** this he can achieve both his desired ends and **abundance** of wealth. Like king, the Parliament had to **work hard to** make the country prosperous.

लोकशाही शासनव्यवस्थेत शासनाच्या कार्यात प्रचंड वाढ झाली आहे. ही वाढीव कार्ये पार पाडण्यासाठी वित्ताची आवश्यकता असते. वित्ताची उभारणी जनतेवर कर आकारून केली जाते. लोकप्रतिनिधीच्या संमतीने म्हणजेच संसदेच्या परवानगीने जनतेकडून कर वसूल करून सार्वजनिक वित्ताची उभारणी केली जाते. जनकल्याणकारी कार्यावर खर्च करण्यासाठी हा पैसा शासनाकडे सूपूर्द केला जातो. ज्याप्रमाणे संसद पैसा उभारू शकते त्याचप्रमाणे या पैशाचा विनियोग योग्य प्रकारे व्हावा हे पाहण्याची जबाबदारी संसदेचीच आहे. परंतू संसदेवर कामाचे प्रचंड ओझे असते तसेच संसदेचे सदस्य आर्थिक बाबतीत तज्ञ असतातच असे नाही. त्यामुळे प्रशासनावर वित्तीय नियंत्रण ठेवण्यासाठी संसदेने काही समित्या निर्माण केल्या आहेत. आजघडीला संसदेच्या ४५ समित्या कार्यरत आहेत. त्यापैकी वित्तीय व्यवहाराशी संबंधित पुढील तीन समित्या महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

**सार्वजनिक लेखा समिती (Public Accounts Committee)**

सार्वजनिक लेखा समितीला लोकलेखा समिती असेही म्हणतात. भारतात १९२३ साली सर्वप्रथम सार्वजनिक लेखा समितीची निर्मिती करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात ही समिती संसदीय समिती नव्हती. तरीदेखिल प्रथमपासून लोकलेखा समिती प्रभावी नियंत्रणकारी समिती होती.

**रचना (Composition)**

राज्यघटना अंमलात आल्यानंतर संसदेच्या पहिल्या अधिवेशनात लोकलेखा समितीची निर्मिती करण्यात आली. प्रारंभी केवळ लोकसभेतून १५ सदस्य या समितीत होते. ज्याअर्थी नियंत्रक व महालेखा परीक्षकांचा अहवाल राज्यसभेपुढे ठेवला जातो.

त्याअर्थी लोकलेखा समितीमध्ये राज्यसभेला प्रतिनिधीत्त्व असावे हा विचार पुढे आला आणि या समितीत राज्यसभेलाही प्रतिनिधीत्त्व देण्यात आले.

**सदस्य संख्या (Members)**

लोकलेखा समितीत एकूण २२ सदस्य असतात. त्यापैकी १५ सदस्य लोकसभेतून व ७ सदस्य राज्यसभेतून असतात. मंत्रिमंडळाचे सदस्य या समितीचे सदस्य होऊ शकत नाहीत.

**निवड (Selection)**

लोकलेखा समितनीची निवड दरवर्षी एकल संक्रमणीय मत (Single Transferable Vote) आणि प्रमाणशीर प्रतिनिधीत्त्व (Proportional Representation) पद्धतीने होते. त्यामुळे विविध राजकीय पक्षांना त्यांच्या संख्याबलानुसार समितीत स्थान मिळते. ही समिती शासनाच्या प्रभावापासून मुक्त असते.

**अध्यक्ष (Chairman)**

लोकलेखा समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती लोकसभेचे सभापती करतात. इंग्लंडमध्ये लोकलेखा समितीचे अध्यक्षपद विरोधीपक्षाकडे दिले जाते. या समितीत लोकसभेचा उपसभापती असेल तर तोच अध्यक्ष बनतो. तरीही एकूण सदस्यांपैकी वित्तीय क्षेत्रात तज्ञ असणाऱ्या सदस्याकडे अध्यक्षपद दिले जाते.

**घटनात्मक दर्जा (Constitutional Status)**

भारतीय राज्यघटनेत लोकलेखा समितीचा नामोल्लेख करण्यात आला नाही. राज्यघटनेच्या कलम ११८ नुसार संसदेला व कलम २०८ नुसार रा[illegible] कायदेमंडळाला अशी समिती स्थापन करण्याचा अधिकार मिळाला आहे. त्यानुसार संसदीय कामकाज नियम १४३ मध्ये या समितीची रचना व कार्ये स्पष्ट करण्यात आली आहेत.

**कार्यकाल (Tenure)**

लोकलेखा समितीचे सदस्य एका वर्षासाठी निवडले जातात. ते पुनर्निर्वाचनासाठी पात्र असतात. सदस्यांचा कार्यकाल १ मे ते ३० एप्रिल असा असतो.

**उपसमित्या (Sub-Committees)**

सभापतीच्या सुचनेनूसार या समितीला कार्यात मदत करण्यासाठी उपसमित्या स्थापन करता येतात.

**कार्ये (Functions)**

सार्वजनिक लेखा समितीला पुढीलप्रमाणे कार्ये करावी लागतात.



१. लोकसभेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पातील नियमानुसार सार्वजनिक पैसा खर्च होतो किंवा नाही हे तपासून पाहणे आणि गैरवाजवी खर्चावर टिका करणे.

२. एका कार्यासाठी मंजूर झालेला निधी दुसऱ्या कार्यावर खर्च झाला असेल तर तो आवश्यक कायद्याच्या आधारे खर्च झाला आहे किंवा नाही हे पाहणे.

३. अधिकार दिलेल्या यंत्रणेनेच खर्च केला आहे किंवा नाही ते पाहणे.

४. सरकारी व बिनसरकारी नियंत्रणाखाली असलेले उद्योगधंदे, व्यापारी कंपन्या इत्यादींचे हिशेब शासकीय लेखापरीक्षकांनी तपासल्यानंतर ते पुन्हा तपासणे.

५. एखाद्या कार्यावर मंजूरीपेक्षा जास्त पैसा खर्च झाला असेल तर त्याविषयी चौकशी करून आपले मत लोकसभेला कळविणे.

६. राष्ट्रपतीने शासकीय- हिशेब तपासनिसांकडून इतर कोणत्याही शासकीय भांडाराचे हिशेब तपासून घेतले असतील तर त्यांची छाननी करून आपले मत मांडणे.

नियंत्रक व महालेखा परीक्षकाच्या नियंत्रणाखाली लोकलेखा समितीचे तपासणी कार्य चालते. नियंत्रक व महालेखा परीक्षक लोकलेखा समितीला कार्याची रूपरेषा ठरवून देतो. या समितीला तोच सूचना व मार्गदर्शन करतो. म्हणून त्याला लोकलेखा समितीचा मित्र, तत्त्वज्ञानी व मार्गदर्शक (**Friend, Philosopher and Guide**) म्हटले जाते.

**लोकलेखा समितीची उपयुक्तता**

**(Utility of Public Accounts Committee)**

शासनाच्या आर्थिक व्यवहारावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी लोकलेखा समितीची निर्मीती करण्यात आली आहे. ही समिती हिशेब तपासण्याचे कार्य जबाबदारीने पार पाडते. तरीही या समितीच्या उपयुक्ततेसंबंधी प्रश्न उपस्थित केला जातो.

लोकलेखा समितीचे कार्य म्हणजे प्रेताची उत्तरीय तपासणी (Post-mortem) करण्यासारखे आहे. कारण शासनाकडून एकदा पैसा खर्च झाल्यानंतर त्या खर्चाची तपासणी करण्यात काहीही अर्थ उरत नाही, अशी टीका या समितीवर करण्यात येते. तरीदेखील या समितीमुळे शासनाच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण प्रस्थापीत झाले आहे. शासकीय खर्चात होणारे गैरव्यवहार व अकार्यक्षमता यांची चौकशी होऊन भविष्यात या दोषांपासून प्रशासन मुक्त राहू शकते. सार्वजनिक लेखा समितीने केलेली तपासणी व शिफारशी संसदेला उपयोगी ठरतात.

## अनुमान समिती / अंदाज समिती (Estimate Committee)

The fundamental objectives of the Estimate Committee are economy, efficiency in administration and ensuring that money in well laid out.

१९३८ साली अंदाजसमितीविषयी कल्पना मांडण्यात आली. परंतू ब्रिटीश सरकारने या कल्पनेला विरोध केला त्यामुळे अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी १९५० पर्यंत कोणतीही समिती अस्तित्वांत नव्हती. भारतीय राज्यघटनेनुसार १० एप्रिल १९५० रोजी पहिली अंदाज समिती अस्तित्वात आली. पुढे १९५३ मध्ये तिच्या कार्यात वाढ करण्यात आली. भारतात केंद्रीय व घटकराज्यीय विधिमंडळात अंदाज समित्या कार्य करीत असलेल्या दिसतात.

**निर्मिती (Establishment)**

अंदाज समितीची निर्मीती लोकसभेच्या नियमावलीनुसार केली जाते. 'कार्यपद्धती व कामकाज चालनाचे नियम' यातील नियम क्रमांक ३१०, ३११ आणि ३१२ यामध्ये समितीची रचना आणि कार्ये यासंबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत.

**रचना (Composition)**

अंदाज समितीची रचना व कार्ये लोकलेखा समितीपेक्षा वेगळी आहेत. अंदाजपत्रकाची छाननी करून त्यात काटकसर सूचविणारी ही समिती आहे. म्हणून या समितीला काटकसर समिती म्हटंले जाते. या समितीची कार्यकक्षा व्यापक आहे. अंदाज समितीला सार्वजनिक उपक्रमाबाबत देखिल अधिकार आहेत.

**सदस्य संख्या (Members)**

अंदाज समितीमध्ये एकूण ३० सदस्य असतात. लोकसभेमधूनच सर्व सदस्य निवडले जातात.

**गण संख्या (Coram)**

अंदाज समितीला आपले कामकाज चालवण्यासाठी १/३ सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे.

**कार्यकाल (Tenure)**

अंदाज समितीतील सदस्यांचा कार्यकाल १ वर्षाचा असतो. सर्वच सदस्यांना फेरनिवडीची संधी मिळते.



**अध्यक्ष (Chairman)**

लोकसभेचे सभापती या समितीच्या अध्यक्षाची निवड करतात. जर लोकसभेचा-उपसभापती या समितीचा अध्यक्ष असेल तर तोच या समितीचा अध्यक्ष बनतो.

**उपसमित्या व अभ्यासदौरे (Sub-Committees and Study Tours)**

अंदाज समितीला कार्याच्या मदतीसाठी उपसमित्या निर्माण करता येतात. तसेच अभ्यास दौरेही आयोजित केले जातात.

**निवड (Selection)**

अंदाज समितीतील सदस्यांची निवड प्रमाणशीर प्रतिनिधीत्त्व व एकलसंक्रमणीय मतदान पद्धतीच्या तत्वाव्दारे केली जाते.

**कार्ये (Functions)**

लोकसभेच्या 'कार्यपद्धती व कामकाज चालनाचे नियम' यानुसार नियम क्र. ३१० मध्ये या समितीची कार्ये विशद केली आहेत.

१) धोरणानुसार असलेल्या अनुमानांचे परीक्षण करून आपला अहवाल सादर करणे. त्यात प्रशासनाच्या खर्चातील काटकसर, संघटनेमधील सुधारणा, प्रशासकीय सुधारणा, कार्यक्षमता यांचा समावेश असावा.

२) अंदाजपत्रकातील धोरणांशी अनुकूल राहून सरकारी यंत्रणेत काही सुधारणा सुचवून प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणे.

३) अंदाजपत्रक व त्यातील धोरणानुसार पैशाचे योग्यरीतीने प्रत्येक कामावर वाटप झाले आहे की नाही हे पाहणे.

४) विविध खर्चाचे अंदाज लोकसभेत कोणत्या पद्धतीने मांडले जावेत हे ठरविणे त्यासाठी प्रपत्र वा नमूना तयार करण्यासंबंधी सूचना करणे.

अशा रीतीने अंदाज समिती अंदाजपत्रकाची छाननी करून खर्चाची काटकसर व प्रशासनाची कार्यक्षमता याविषयी शिफारशी करण्याचे कार्य करते.

**उपयुक्तता (Utility)**

प्रशासनात कार्यक्षमता, काटकसर, स्थैर्य निर्माण करण्यासाठी अंदाज समितीचे कार्य महत्वाचे आहे. आजवरील अनुभवावरून ही समिती उपयुक्त ठरल्याचे सिद्ध झाले आहे. या समितीने केलेल्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहेत. जेंव्हा अंदाजसमितीने वाजवीपेक्षा जास्त अधिकाराचा वापर करून शिफारशी केल्या तेंव्हा अशा शिफारशी संसदेने फेटाळल्या आहेत.

अंदाज समितीवर टीका करताना श्रीयुत अशोक चंदा यांनी असे म्हटले आहे की,

**'अंदाज समिती वस्तुनिष्ठ घटनांचा अभ्यास करण्याऐवजी ती एक दोषदर्शक यंत्रणा बनत आहे.'**

अशा प्रकारची टीका या समितीवर होत असली तरी या समितीच्या उपयुक्ततेकडे डोळेझाक करता येणार नाही. कारण आजपर्यंत या समितीने केलेल्या जवळपास ९७ टक्के शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत. आर्थिक नियंत्रणाच्या बाबतीत भारतात अनुमान समिती उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे. या समितीला तांत्रिक मदत मिळाल्यास ही समिती आपले कार्य प्रभावीपणे करू शकते.

**सार्वजनिक उपक्रम समिती / लोक उद्यम समिती**

**(Committee on Public undertaking)**

आधुनिक काळात सार्वजनिक उद्योगधंद्यांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची वाढ झाली नव्हती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही व कल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारली लोककल्याणकारी राज्यात लोकांच्या सर्वांगिण कल्याणाची जबाबदारी शासनाची असते. जनकल्याणासाठी प्रचंड पैसा लागतो. हा पैसा उभा करण्यासाठी शासनाने व्यापारी क्षेत्रात प्रवेश केला व अनेक सार्वजनिक उपक्रम निर्माण केले. या सार्वजनिक उपक्रमाच्या स्थापनेमुळे असंख्य बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले तसेच या उपक्रमांना जो फायदा व्हायचा तो शासनाच्या तिजोरीत जमा होऊन जनकल्याणाच्या कार्यासाठी खर्च केला जात असे. या सार्वजनिक उपक्रमांना आपले कार्य व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी स्वायत्तता दिली गेली. त्याचबरोबर या सार्वजनिक उपक्रमामध्ये जो प्रचंड पैसा गुंतवण्यात आला तो पैसा जनतेचा होता. सार्वजनिक उपक्रमांनी मिळालेल्या स्वायत्ततेचा गैरवाजवी वापर करू नये व काही आर्थिक गैरव्यवहार करू नयेत म्हणून संसदेचे प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक बनले म्हणूनच सार्वजनिक उपक्रमावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संसदेने सार्वजनिक उपक्रम समिती निर्माण केली आहे.

सार्वजनिक उपक्रमांसाठी संसदीय समिती असावी यासंदर्भात सर्वप्रथम लोकसभेत १९५३ मध्ये डॉ. लंकासुंदरम यांनी एका प्रस्तावाव्दारे मागणी केली. तसेच प्रशासकीय सुधारणा आयोगाने देखिल अशा समितीच्या निर्मितीसंबंधी सूचना केली. श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनी देखिल अशा प्रकारच्या समितीच्या स्थापनेची मागणी केली.



२० नोव्हेंबर १९६३ रोजी सार्वजनिक उपक्रम समितीच्या निर्मितीला मान्यता देण्यात आली आणि १ मे १९६४ रोजी या समितीचे सदस्य निवडले गेले. श्री. पी. गोविंद मेनन हे सार्वजनिक उपक्रम समितीचे पहिले अध्यक्ष होते. पहिल्या समितीत एकूण १५ सदस्य होते पैकी १० लोकसभेतून तर ५ राज्यसभेतून निवडले गेले.

**रचना (Composition)**

लोकसभा कार्यपद्धती आणि कामकाज चालन नियमांच्या क्रमांक ३१२ मध्ये सार्वजनिक उपक्रम समितीच्या रचनेसंबंधी तरतूद करण्यात आली आहे.

**सदस्य (Members)**

सार्वजनिक उपक्रम समितीत एकूण २२ सदस्य असतात. त्यापैकी १५ सदस्य लोकसभेतून व ७ सदस्य राज्यसभेतून निवडले जातात.

**कार्यकाल (Tenure)**

सार्वजनिक उपक्रम समितीचा कार्यकाल एका वर्षाचा असतो. १ मे ते ३० एप्रिल हा समितीचा कार्यकाल असतो.

**निवड (Selection)**

सार्वजनिक उपक्रम समितीतील सदस्यांची निवड एकल संक्रमणीय मतदान पद्धती व प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वानुसार होते. त्यामुळे सर्व पक्षांना यासमितीत स्थान मिळते. एकदा निवडलेला सदस्य पुनर्निवडीस पात्र असतो.

**अध्यक्ष (Chairman)**

सार्वजनिक उपक्रम समितीतील सदस्यांमधून सत्ताधारी पक्षाच्या ज्येष्ठ सदस्यांची अध्यक्षपदी निवड लोकसभा सभापतीव्दारे केली जाते.

**अधिकार व कार्ये (Powers and Functions)**

सार्वजनिक उपक्रम व्यापारी तत्वावर चालवले जातात. या उपक्रमांना अंतर्गत कार्यासाठी स्वायत्तता दिली जाते. सार्वजनिक उपक्रमावरील संसदीय नियंत्रणाची जबाबदारी सार्वजनिक उपक्रम समितीवर असते.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्याची चर्चा लोकसभा कार्यपद्धती व कामकाज चालन नियमावली मध्ये करण्यात आली आहे. ही समिती ज्या सार्वजनिक उपक्रमांच्या कामकाजाचे परीक्षण करील त्या उपक्रमांची यादी लोकसभा कार्यपद्धती व कामकाज - चालन नियमावलीतील ४ थ्या परिशिष्टात दिली आहे, ती पुढील प्रमाणे आहे.

दामोदर व्हॅली कार्पोरेशन, भारताचे औद्योगिक वित्त महामंडळ, इंडियन एअर

लाईन्स, एअर इंडिया, भारतीय जीवन विमा महामंडळ, केंद्रीय वखार महामंडळ, अन्न महामंडळ, तेल व नैसर्गिक वायू महामंडळ, आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण, औद्योगिक विकास बँक, दिल्ली वाहतूक महामंडळ, हिंदुस्थान एरॉनोटिक्स लिमिटेड, बंगलोर, माझगांव डॉक लिमिटेड, बॉम्बे, गार्डन रीच लि. कलकत्ता इ.

**सार्वजनिक उपक्रम समितीची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.**

१. वरील सर्व उपक्रमांचे लेखे आणि अहवाल तपासणे.

२. नियंत्रक व महालेखा परीक्षकाकडून आलेले सार्वजनिक उपक्रमा संबंधीचे अहवाल तपासणे.

३. सार्वजनिक उपक्रमाची कार्यक्षमता व स्वायत्तता याबाबत तपासणी करणे. हे उपक्रम व्यापारी तत्त्वावर व व्यापारी पद्धतीने चालतात की नाही ते पाहणे.

**मर्यादा (Limitations)**

सार्वजनिक उपक्रम समितीवर काही मर्यादा आहेत. ही समिती पुढील बाबींची तपासणी करणार नाही.

१. सार्वजनिक उपक्रमाची व्यापारी स्वरूपाच्या कार्याखेरीज शासनाच्या कोणत्याही धोरणांची तपासणी करणार नाही.

२. सार्वजनिक उपक्रमाच्या दैनंदिन प्रशासनासंबंधी बाबी तपासणार नाही.

३. एखाद्या विशेष नियमानुसार सार्वजनिक उपक्रमाबद्दल विचारविनीमय करण्यासाठी एखादी यंत्रणा उभारली असल्यास त्या संबंधीच्या बाबींची तपासणी सार्वजनिक उपक्रम समिती करणार नाही. सार्वजनिक उपक्रम समितीची कार्ये व कार्यावरील मर्यादा वरील प्रमाणे आहेत.

**कार्यपद्धती (Procedure of work)**

सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यासाठी काही विषय व ठराविक उपक्रमांची निवड करून वार्षिक कार्यक्रमांची आखणी केली जाते. ही समिती प्रत्यक्ष क्षेत्रात जावून चौकशी करते. या समितीकडे सचिवालयीन कर्मचारी असतात. हे कर्मचारी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून देतात. या समितीच्या कार्यात प्रत्यक्ष नियंत्रक व महालेखा परीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी मदत करतात. सार्वजनिक उपक्रमाच्या कामकाजात तथ्य शोधण्याचे कार्य ही समिती करते.

**उपयुक्तता (Utility)**

सार्वजनिक उपक्रम समितींचा अहवाल संसदेला सादर केल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा होते. सार्वजनिक उपक्रम समितीच्या सूचना गांभिर्याने विचारात घेतल्या



जातात. सार्वजनिक उपक्रमातील पैसा जनतेचा असतो. त्या पैशाचा अपव्यय होऊ नये व सार्वजनिक उपक्रमांना मिळालेल्या स्वायत्ततेचा त्यांनी गैरवाजवी वापर करू नये, म्हणून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक उपक्रम समिती उपयुक्त ठरते. सार्वजनिक उपक्रम समितीच्या धास्तीने सार्वजनिक उपक्रमातील अधिकारी वर्ग आपले कार्य अधिक जबाबदारीने पार पाडतो. सार्वजनिक उपक्रमांचा लाभ समाजातील सर्वसामान्य जनतेला मिळावा यासाठी या समितीचे अस्तित्व विशेष उल्लेखनीय ठरते.

***